सकाळ कनेक्ट

ब्रॉयलर पोल्ट्री फार्मविषयी ३० जूनपासून मार्गदर्शन

पुणे, ता. २२ : चिकनची वाढती मागणी लक्षात घेता ब्रॉयलर पोल्ट्री फार्म सुरू करण्यासाठी वाव आहे. पोल्ट्री फार्मचे नियोजन, अपेक्षित भांडवल, ब्रॉयलर पक्ष्यांचे संगोपन, खाद्य व्यवस्थापन, जागेची निवड, शेडची रचना, पक्ष्यांचे आजार- उपचार, लसीकरण, व्यवसायाचे अर्थशास्त्र, मार्केटिंग इत्यादी विषयांचे मार्गदर्शन ३० जून व १ जुलै रोजी होत आहे. यासोबतच पोल्ट्री फार्मला प्रत्यक्ष भेटसुद्धा आयोजित केली आहे. प्रतिव्यक्ती शुल्क तीन हजार तीनशे रुपये. आगाऊ नावनोंदणी आवश्यक.

संपर्क : ८६०५६९९००७.

अभिनयात करिअरची संधी

अभिनयाची आवड असणाऱ्या प्रत्येकाला अभिनयातील उत्तम प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळावे, याकरिता पहिल्या दोन यशस्वी बॅचनंतर चार महिने वीकएंडला चालणाऱ्या थिएटर आणि अभिनय अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या बॅचला सुरवात होत आहे. या अभ्यासक्रमानंतर नाटक, टेलिव्हिजन मालिका, जाहिराती, चित्रपट, लघुपट आदी क्षेत्रांत काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. प्रशिक्षणार्थींना चिन्मयी सुमीत, अनंत जोग यांसारख्या अनुभवी अभिनेत्यांचे मार्गदर्शन होणार आहे. प्रतिव्यक्ती शुल्क अठ्ठावीस हजार चारशे रुपये.

संपर्क : ७३५०००१६०१

मोबाईल फिल्म मेकिंग कार्यशाळा

तंत्रज्ञानाच्या रोजच्या बदलत्या जगात चित्रपटसृष्टीतही अनेक बदल होत आहेत. सहज उपलब्ध असणाऱ्या स्मार्टफोनद्वारेही लघुपट, जाहिराती, माहितीपट बनवता येऊ शकतात. त्यासाठी त्या तंत्रज्ञानाचे आवश्यक ज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध दिग्दर्शक शिवाजी करडे यांची मोबाईल फिल्म मेकिंगची तीन दिवसांची कार्यशाळा सोमवारपासून (ता. २५) होत आहे. प्रशिक्षणात मोबाईल फिल्म मेकिंगची तत्त्वे, पद्धती, प्रकार, नियोजन आदींविषयी मार्गदर्शन होईल. प्रशिक्षणात लघुपट निर्मितीही केली जाणार आहे. प्रतिव्यक्ती शुल्क पाच हजार पाचशे रुपये.

संपर्क : ७३५०००१६०१

'सीसीएनए'चा प्रमाणपत्र अभ्यासक्रम

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात नोकरी करू इच्छिणाऱ्यांचा नेटवर्किंगचा अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर ३० जूनपासून तीन महिन्यांच्या 'सीसीएनए' प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला सुरवात होत आहे. यामध्ये नेटवर्किंग टेक्नॉलॉजी, नेटवर्क डिझाइन, नेटवर्क प्रोटोकॉल, क्लायंटच्या आवश्यकतेनुसार नेटवर्कचे डिझाइन इत्यादी प्रात्यक्षिकांसोबत शिकविले जाणार आहे. आयटीचे विद्यार्थी आणि व्यावसायिकांना खूप फायदा होईल. प्रतिव्यक्ती शुल्क पंधरा हजार रुपये.

संपर्क : ९३७२२६००००

शिपिंग-लॉजिस्टिकचे नवीन ट्रेंड

आयात- निर्यातीतील महत्त्वाचा भाग असलेल्या 'शिपिंग अँड लॉजिस्टिक'विषयी मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण ३० जून आणि १ जुलैला होत आहे. यात फ्राइट फॉरवर्डर, नॉन व्हेसल ऑपरेटिंग कॉमन कॅरिअर, कन्सॉलिडेशन, एफसीएल/ एलसीएल, कंटेनर लोड प्लॅन, फ्राइट कॅल्क्युलेशन, सीकेडी, एसकेडी, सीबीयू कंडिशन, ब्रेक बल्क कार्गो, केस स्टडीज, इम्पोर्ट पॉलिसी, एचएस कोड, प्रॉडक्ट इम्पोर्ट सायकल, इम्पोर्ट ड्यूटीज आदींविषयी तज्ज्ञ माहिती देतील. उद्योजक, उत्पादक, निर्यातदार, निर्यात कंपन्यांचे वित्त व्यवस्थापक, जागतिक बाजारपेठेचा आढावा घेणारे, चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, एमबीएचे विद्यार्थी, नव्याने आयात- निर्यात करू इच्छिणारे सहभागी होऊ शकतात. प्रतिव्यक्ती शुल्क तीन हजार पाचशे रुपये. **संपर्क :** ९९३००७०१३३

सर्व प्रशिक्षणे, कार्यशाळा सिंबॉयसिस इंटरनॅशनल इंटरडिसीप्लिनरी लर्निंग सेंटर, सकाळनगर, बाणेर रस्ता, पुणे येथे होतील.

एनजीटीच्या आदेशाकडे काणाडोळा

महापालिका, पाटबंधारे विभागाकडून कारवाई नाही; नदीपात्रातील अतिक्रमणे 'जैसे थे'

पुणे, ता. २२ : मुळा-मुठा नदीच्या पूररेषेतील (म्हात्रे पूल ते राजाराम पूल) अतिक्रमणे निदर्शनास आणून देत, त्यावर हतोडा उगारण्याचा राष्ट्रीय हरित प्राधिकरणाचा (एनजीटी) आदेश महापालिका आणि पाटबंधारे विभागाने बासनात बांधून ठेवला आहे. हा आदेश देऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटला, तरी येथील एकाही अतिक्रमणाला दोन्ही यंत्रणांनी साधा धक्काही लावला नाही. उटलपक्षी गेल्या सहा महिन्यांत बेकायदा व्यावसायिकांनी आपला विस्तार केल्याचे पाहणीत आढळून आले. लोकप्रतिनिधींचा दबाव आणि अधिकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे या दोन्ही नद्यांचा जीव गुदमरतो असल्याचे यामुळे दिसून येत आहे.

शहराच्या विकास आराखड्यातील (डीपी) म्हात्रे पूल ते राजारामपूल रस्त्यालगतच्या नदीपात्रात अनेक अतिक्रमणे झाली आहेत. त्यात मंगल कार्यालय, लॉन्स, हॉटेल थाटण्यात आले आहेत. त्यासाठी केलेली काही बांधकामे बेकायदा असल्याचे उघड झाले आहे. काही व्यावसायिकांनी तात्पुरत्या स्वरूपाचे शेडही बांधले आहेत. पूररेषेच्या गोंधळाचा फायदा घेत, काही जणांनी पूररेषेच्या आतच आपली दुकाने उभारली आहेत. या अतिक्रमणांमुळे नदीचे मूळ पात्र अरुंद झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी, पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून येथील अतिक्रमणे काढण्याची मोहीम महापालिकेने जाहीर केली. प्रत्यक्षात मात्र कार्यवाही झालेली नाही. पर्यावरणप्रेमींच्या आक्षेपांची गंभीर दखल घेत येथील अतिक्रमणे काढण्याचा आदेश 'एनजीटी'ने गेल्या वर्षी महापालिका आणि पाटबंधारे खात्याला दिला होता. यासंदर्भातील कारवाईचा अहवाल मांडण्याची तंबीही दिली होती. त्यामुळे या दोन्ही यंत्रणांना चार दिवस कारवाई केल्याचे दाखविले व त्यात बांधकामांना हात न लावता तात्पुरते शेड पाडले होते.

पुणे : नदीपात्रात सर्रास राडारोडा टाकण्यात येत असल्याने नदीपात्राची रुंदी कमी होत आहे. राडारोडा टाकायचा आणि त्यानंतर सपाटीकरण करून अतिक्रमण करायचे असे प्रकार ठिकठिकाणी होताना दिसतात.

यंदा तरी कारवाई होणार का?

या ठिकाणच्या व्यावसायिकांनी बेकायदा नळजोड घेतल्याचेही महापालिकेच्या निदर्शनास आले. तरीही संबंधितांवर कारवाई पुढे सरकली नाही. त्यामुळे व्यावसायिकांचे धाडस वाढले. पावसाळा सुरू झाल्याने नदीपात्रातील अतिक्रमणे पुन्हा चर्चेत आली आहेत. त्यामुळे यंदा तरी महापालिका आणि पाटबंधारे खाते 'एनजीटी'चा आदेश गांभीर्याने घेणार का, असा प्रश्न पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे.

मंगल कार्यालये, लॉन्स	५१
बेकायदा नळजोड	२७
बजाविलेल्या नोटिसा	१०

> नदीपात्रातील अतिक्रमणे काढली आहेत. व्यावसायिकांकडील कागदपत्रे तपासण्यात आली आहेत. काही बांधकामांना परवानगी आहे. मात्र, बेकायदा बांधकामे पाडण्यात आली असून त्यावर सातत्याने कारवाई केली जात आहे.
>
> **- राजेश बनकर,** कार्यकारी अभियंता, महापालिका

> 'एनजीटी'च्या आदेशानुसार एक टक्काही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे अतिक्रमणांची संख्या वाढत आहे. त्यामुळे नदीच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत आहे. महापालिका तक्रारींची दखल घेत नाही.
>
> **- सारंग यादवाडकर,** पर्यावरणाचे अभ्यासक

#PuneIssues
आपली मते, प्रतिक्रिया कळवा.
ई-मेल करा webeditor @esakal.com वर
व्हिडिओ पहा... www.esakal.com

'महाबॅंकेच्या पदाधिकाऱ्यांवर अभ्यास न करता कारवाई'

पुणे, ता. २२ : "महाराष्ट्र बॅंकेच्या पदाधिकाऱ्यांवर पोलिसांनी नियमांचा अभ्यास न करता घाईने कारवाई केली आहे. यामुळे बॅंकिंग क्षेत्रात घबराटीचे वातावरण असून, त्याचा कर्जपुरवठ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या प्रकरणात आता केंद्र आणि राज्य सरकारला लक्ष घालावे लागेल," असे मत महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले.

अनास्कर म्हणाले, "डी. एस. कुलकर्णी यांच्याविरोधात ठेवीदारांनी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाचा तपास करताना पोलिस बॅंकेच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करू शकत नाहीत. या पदाधिकाऱ्यांनी नियमभंग करून कर्ज दिले असेल, तर त्यांना रिझर्व्ह बॅंक संबंधित बॅंक दंड करू शकते. तसेच, कर्जपुरवठा करणाऱ्या बॅंकेने त्यांच्या पदाधिकाऱ्यांविरोधात तक्रार दिली, तरच पोलिसांना कारवाई करता येते."

"महाराष्ट्र बॅंकेच्या पदाधिकाऱ्यांवर पोलिसांनी केलेली कारवाई नियमाला धरून नाही. एखाद्या कामासाठी कर्ज दिले आणि त्यासाठी ते वापरले नाही, तर यात बॅंकेच्या पदाधिकाऱ्यांना कसे दोषी ठरविता येईल? अशाप्रकारे पदाधिकाऱ्यांवर कारवाई केली, तर कोणत्याच बॅंकेचे पदाधिकारी सामान्यांना कर्ज देण्यासही तयार होणार नाहीत. अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होईल. त्यामुळे केंद्र सरकारच्या स्तरावरून या विषयात लक्ष घालावे लागणार आहे," असे अनास्कर यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा

पुणे, ता. २२ : पुराणिक फाउंडेशनतर्फे समर्थगड येथे अमेरिका आणि भारतातील विद्यार्थ्यांसाठी सामूहिक कार्यशाळा सोमवारपासून सुरू झाली. हे विद्यार्थी इम्पॅक्ट इंडिया कार्यक्रमांतर्गत समर्थगड येथे राहायला जातात.

कालव्याला संरक्षक भिंत नाही

महापौरांनी घेतली दखल

घोरपडी : बी. टी. कवडे रस्ता आणि रेसकोर्सला जोडणारा, एम्प्रेस गार्डनजवळ कालव्यावरील खचलेल्या रस्त्याबाबतचे वृत्त आणि व्हिडिओ सकाळ संवादमध्ये २० जूनला प्रसिद्ध झाला होता. याची दखल घेऊन माजी महापौर नगरसेवक प्रशांत जगताप यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. याप्रश्नी आवाज उठविणारे विजय अडागळे, सामाजिक कार्यकर्ते सचिन दळवी, प्रमोद कवडे-पाटील या वेळी उपस्थित होते. हा रस्ता जागोजागी खचल्याची, तसेच पथदिवेही नसल्याची माहिती त्यांनी जगताप यांना दिली. त्यावर संरक्षक भिंत आणि पथदिवे उभारण्याचे आश्वासन जगताप यांनी दिले. सदर प्रश्नाची दखल वेळीच दखल घेतल्याबद्दल सकाळ आणि प्रशासनाचे आभार.

- विजय अडागळे

हे चित्र कधी बदलणार?

सर्वसामान्य नागरिकांना प्रभागातील समस्यांविषयी मंत्र्यांना भेटायचे असल्यास मुंबईतील मंत्रालयात जावे लागते. त्यासाठी आधी भेटीची वेळ ठरवून घ्या, नंतर दुसरी दोननंतर रांगेत उभे राहा. त्यानंतर तपासणी केल्यावर आत सोडले जाते. तिथे उभे राहून माणूस बेहाल होतो. आत गेले तर महोदय नसतात. हे चित्र कधी बदलणार?

- प्रशांत बोगम

चला, बनूया सिटिझन जर्नालिस्ट...
सकाळ संवाद Android ॲप आजच मोबाईलवर डाउनलोड करा
Google Play

बातमी पाठविताना नाव व ठिकाणाचा अवश्य उल्लेख करा

JAYAWANT SHIKSHAN PRASARAK MANDAL, PUNE
MBA प्रवेशा सबंधीत नोटीस

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सामायिक प्रवेश प्रक्रियेतून MBA प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांसाठी DTE मुंबई च्या नविन अधिसुचनेनुसार आवश्यक मुळ कागदपत्र पडताळणीसाठी ची मुदत २८ जून २०१८ पर्यंत वाढविली असून सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घेवून DTE मान्यता असलेल्या FC (फॅसिलिटेशन सेंटर) मध्ये जावून प्रक्रिया पूर्ण करावी. जे.एस.पी.एम. (JSPM) संस्थेचे अधिकृत FC सेंटरची नावे खालीलप्रमाणे.

FC CENTER @ JSPM www.jspm.edu.in
All Institutes are Affiliated to Savitribai Phule Pune University (Which is Oxford of East)

Jayawant Institute of Management Studies (M.B.A.), Tathawade, Pune
S. No. 80/3, Pune - Mumbai Bypass Highway, Tathawade, Pune -33.
M.: 9921349091, 8888887250, 8237076937

Jayawantrao Sawant Institute of Management & Research (MBA), Hadapsar, Pune
S. No. 58, Handewadi Road, Hadapsar, Pune -28.
Ph.: 020-26970882, 9922750673, 7875743007

Kautilya Institute of Management & Research (M.B.A.), Wagholi, Pune
G. No. 720/1 & 2, Pune - Nagar Road, Wagholi, Pune-17.
Ph.: 9423788421, 9970410263, 020-67335100/104

JSPM Narhe Technical Campus (MBA Programme) Narhe, Pune
S.No. 12/2/2 & 14/9/, Narhe, near Swaminarayan Mandir Tal. Haveli, Pune -41.
Ph. 020-24608700, 9767617171, 9970434504

The office will remain open even on sunday
8 Campus | 78 Institutes | 60,000 Students | 450 Buses | All Over Pune 450 Bus Route
Dr. Tanajirao Sawant
Founder Secretary

JAYAWANT SHIKSHAN PRASARAK MANDAL, PUNE
JAYAWANTRAO SAWANT COLLEGE OF COMMERCE AND SCIENCE, HADAPSAR
Sr. No. 58, Indrayani Nagar, Handewadi Road, Hadapsar, Pune-28
(Approved by Government of Maharashtra and Affiliated to SPPU, Pune)

ONLINE ADMISSION 2018-19
FOR THE FOLLOWING COURSES

FY B.Com.	English Medium Intake : 120
FY B.Sc.	Intake : 120

Online Admission Form available on website : www.jspmjscocs.edu.in

Features ▸ Excellent infrastructure ▸ Dedicated staff ▸ Well maintained play ground. ▸ Extra Co-curricular activities ▸ Value based education ▸ Transport facility
Contact Numbers for Queries :
020 (26970886 / 26970887 / 26970888)
9970022816 / 7066200941
Website: www.jspm.edu.in
Visit to Campus
8campus 78 Institutes 400 Buses 60,000 Students
Dr. T. J. Sawant
Founder Secretary

Sakal Media Group
agrowon Events & Exhibitions
ऐकलंत का ? आपलं स्वप्न लवकरच साकार होणार सकाळ ग्रीन होम एक्स्पोमुळे... !
अरे वा! तर मग कसला विचार करतेस चल आजच बुक करूया आपल्या स्वप्नातला प्लॉट.
अॅग्रोवन

आज प्रदर्शनाचा ॥ शुभारंभ ॥

Green HOME
EXPO 2018
Season 18

बहुविध ग्रीनरी प्लॉट्स आणि फार्म हाउसचे पर्याय...
तेही परवडणाऱ्या किमतीत... सर्व काही एकाच ठिकाणी...

बंगलो प्लॉट्स | NA प्लॉट्स | फार्म हाउस प्लॉट्स | वीकएंड होम | रेडी फार्म हाउस

ता. 23 व 24 जून 2018
स्थळ : गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८

प्रोजेक्ट लोकेशन्स - भोर, सारोळा, वाई, महाबळेश्वर, दापोली, सावंतवाडी, वेल्हे, शिरवळ, हिंजवडी, कामशेत, कोकण, मढगाव, नसरापूर, पानशेत, सुधागड पाचगणी, मुळशी, लोणावळा, मंडणगड, गोवा, कात्रज, शिक्रापूर, खडकवासला

PARTICIPAINT LIST : ● SYNERGY HOLIDAY VILLAGE ● NEAR HOMES ● ELYSIAN GROUP ● MANGO BUILDCON PVT LTD ● SAMRAJYA REALITY ● VASTUPURTI HOUSING ● WEEKEND VILLE ● GREEN LAND FARM ● EMPIRE REALTORS & DEVELOPERS ● AGROFARM ● BY THE LAKE - SHIRWAL ● LANDMARK DEVELOPMENT CORPORATION PVT LTD ● PANCHADAYA SHRADDHA REALITY

या शनिवार रविवारसाठी प्लॅन करा आणि नक्की भेट द्या... प्रवेश विनामूल्य

Brand Promotion 2018